# सांस्कृतिक कार्यक्रम / महोत्सव / शिबिर समन्वयक

सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत दरवर्षी महाराष्ट्रभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

उपरोक्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिरांचे संपूर्ण महाराष्ट्रभर आयोजन करण्यात येते. या विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिरांचे स्थानिक आयोजनासाठी सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकार व्यक्तीची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात येते. स्थानिक समन्वयक सांस्कृतिक कार्य संचालनालयाशी समन्वय ठेऊन विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे ढोबळ मानाने दोन भाग असतात.

अ) कार्यक्रम सादरीकरण करणारे कलाकार-

- कलाकार निवड
- कलाकार तालीम
- सहकलाकार निवड

आ) कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक बाबी-

- ध्वनी व्यवस्था
- प्रकाश योजना
- नाट्यगृह / सभागृह
- डिझाईन
- प्रसिध्दी
- सजावट
- नेपथ्य
- एलईडी
- कलाकार निवास व्यवस्था
- प्रवास व्यवस्था

- चहा अल्पोपहार, भोजन
- इतर अनुषंगिक बाबी

उपरोक्त मध्ये अ भागाची निवड सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून करण्यात येईल. ब भागासाठी समन्वयक व्यक्ती/संस्था निवड करणे आवश्यक आहे.

नियुक्त समन्वयक हा सांस्कृतिक कार्य संचालनालयाचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो. समन्वयकाच्या कामामध्ये नाट्यगृह/सभागृह व्यवस्थापन, कलाकार व्यवस्थापन, परीक्षक व्यवस्थापन, पत्रकार व्यवस्थापन, उद्घाटन समारंभ, प्रसिध्दी व इतर आयोजन विषयक कामे सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या समन्वयाने करण्यात येतात.

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर यासाठी नियुक्त केलेला समन्वयक हा त्या जिल्ह्यात आयोजित होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे समन्वयक म्हणून काम पाहत असतो. त्यामुळे काही मुख्य जिल्ह्यांत एका वर्षात वीस पेक्षा जास्त वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होत असतात.

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर यासाठी समन्वयक नियुक्ती करण्यासाठी विशिष्ट अशी कार्यपध्दती नाही. त्यामुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर साठी स्थानिक समन्वयकाचे काम करण्यासाठी समन्वयक नियुक्ती करण्यासाठी एक विहीत कार्यपध्दती करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर स्थानिक आयोजनासाठी वर्षभरासाठी विविध समन्वयकांची आवश्यकता आहे.

खालील नमुद सांस्कृतिक क्षेत्राचे ढोबळ मनाने वर्गीकरण करण्यात येईल.

- लोककला महोत्सव
- नाट्य
- शास्त्रीय संगीत
- विशेष महोत्सव
- छोटेखानी कार्यक्रम

- जयंती / विशेष घटना
- इतर

आतापर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वयक निवडीची पात्रता ही संबंधित समन्वयक हा सांस्कृतिक क्षेत्रातला अनुभवी असणे आवश्यक होता. समन्वयक हा सांस्कृतिक क्षेत्रातली असल्याने सहभागी कलाकार व संस्थांना त्यांना आवश्यक असणारे सहकार्य करणे सोयीचे होते. परंतु यापूर्वी समन्वयक निवड करण्याबाबत कार्यपध्दती नव्हती. त्यामुळे यापुढील विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वयक निवड करण्यासाठी विहित कार्यपध्दती अवलंब करुन समन्वयक निवड करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**विहित पध्दतीचा अवलंब करुन समन्वयक निवड केल्यास होणारे फायदे :-**

१. समन्वयक निवड प्रक्रिया स्पष्ट निकषांवर आधारित असल्याने पक्षपात, गैरसमज किंवा मनमानी टाळली जाईल
२. यामुळे सर्व पात्र व्यक्तींना समन्वयक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होईल
३. निकषांनुसार विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर आयोजन व व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या व्यक्तींची निवड करता येईल
४. यामुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर आयोजन अधिक दर्जेदार, नियोजनबद्ध व यशस्वी होण्यास मदत होईल
५. कुशल समन्वयकामुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर आयोजन नियोजनबद्ध, सुव्यवस्थित आणि प्रेक्षकाभिमुख होण्यास मदत होईल
६. सहभागी संस्थांमध्ये समाधान निर्माण होऊन विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर चा दर्जा व प्रतिष्ठा वाढण्यास मदत होईल.

**समन्वयक नियुक्ती कार्यपध्दती :-**

- समन्वयक पात्रता
- समन्वयक निवड अटी व शर्ती

- अर्ज मागविणे
- अर्जाची छाननी
- निवड समिती
- समन्वयक निवड

**समन्वयक पात्रता :-**

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वयक नियुक्ती करण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीने खालील पात्रता पुर्ण करणे आवश्यक आहे-

१. समन्वयक सांस्कृतिक क्षेत्राशी प्रत्यक्ष निगडीत असावा. (पडद्यामागील किंवा पडद्यावरील अनुभव) याबाबतचे पुरावे सोबत जोडावेत. **(उदा. शिफारस पत्र (ज्येष्ठ कलाकार) व संस्था, बातमी, कामाचे आदेश तसेच पेमेन्ट रिसीप्ट इ.)**

२. समन्वयक किमान १२ वी पास असावा

३. सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित पदविका/ पदवी असल्यास प्राधान्य देण्यात येईल (नाट्यशास्त्र, थिएटर आर्ट, कार्यक्रम व्यवस्थापन इ.) (याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे) **(प्रमाणपत्र सादर केल्यास प्राधान्य)**

४. रंगभूमीविषयक किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाचा / समन्वयाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा (याबाबत पुरावे सोबत जोडणे आवश्यक आहे. **(उदा. कामाचे आदेश सोबत जोडावे)**

५. स्थानिक संस्था, परीक्षक, स्थानिक प्रशासन आणि सांस्कृतिक संस्था यांच्यात उत्तम समन्वय साधण्याची क्षमता असावी.

६. समन्वयकाचे वय २५ पेक्षा कमी नसावे तसेच **जास्तीत जास्त ६० असावे.**

७. समन्वयक कोणत्याही राजकीय पक्ष / गट यासंबंधित नसावा **(याबाबत स्वयंघोषणापत्र सादर करावे)**

८. लोककला, नाट्य सांस्कृतिक घटकांशी संबंधित असावे

९. कोणत्याही फौजदारी व इतर स्वरूपाचे गुन्हे किंवा न्यायालयीन प्रकरणात सहभागी असलेल्या व्यक्ती अर्ज करू शकत नाही. **(याबाबत स्वयंघोषणापत्र सादर करावे तसेच चारित्र्य प्रमाणपत्र सादर करावे)**

१०.स्थानीक प्रशासन किंवा जिल्हा माहिती अधिकारी मार्फत विविध कार्यक्रमांचे यापूर्वी किमान ५ कार्यक्रम आयोजन केलेले असावे किंवा वैयक्तिरित्या स्वत: कार्यक्रमांचे आयोजन केलेले असावे.

**११.संबंधित जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, स्थानिक लोककला आणि कलाकारांची सखोल माहिती असावी. (याबाबत आवश्यकतेनुसार मुलाखत घेण्यात येईल)**

१२.तांत्रिक ज्ञान :- रंगमंच व्यवस्थापन (Stage management), ध्वनी, प्रकाश योजना, आणि कलाकार मानधनाबाबतच्या शासकीय नियमांची (उदा. GR) माहिती असणे आवश्यक आहे. **(याबाबत आवश्यकतेनुसार मुलाखत घेण्यात येईल)**

१३.**संबंधित व्यक्ती त्याच जिल्ह्यातील किंवा लगतच्या जिल्ह्यातील रहिवाशी असावा.**

१४.**रुपये २.०० लक्ष पर्यंत आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या वैयक्तिक समन्वयकांसाठी स्वत: काम केलेले नसले तरी अशा कार्यक्रमात काम करण्याचा अनुभव असावा.**

**समन्वयक संस्था पात्रता :-**

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वयक संस्था नियुक्ती करण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीने खालील पात्रता पुर्ण करणे आवश्यक आहे-

१. समन्वयक संस्था ही सांस्कृतिक क्षेत्राशी निगडीत असावी.

२. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात मागील तीन वर्षापूर्वी नोंदणीकृत असावी. **(नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे)**

३. संस्था ही सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित म्हणून संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (Societies Registration Act) किंवा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (Public Trust Act) अंतर्गत अधिकृतपणे नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.

४. समन्वयक संस्थेच्या घटनेमध्ये सांस्कृतिक हा मुख्य हेतु/उद्देश असावा. **संबंधित संस्थेची निवड झाल्यास त्या संस्थेची घटना सादर करणे आवश्यक राहील.**

५. समन्वय संस्थेची मागील तीन वर्षाचे हिशोब पत्रके धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर केलेली असावी.

६. रंगभूमीविषयक किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाचा / समन्वयाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा (याबाबत पुरावे सोबत जोडणे आवश्यक आहे **उदा. शिफारस पत्र व संस्था, बातमी, कामाचे आदेश व पेमेन्ट रिसीप्ट इ.**)

७. स्थानिक संस्था, परीक्षक, स्थानिक प्रशासन आणि सांस्कृतिक संस्था यांच्यात उत्तम समन्वय साधण्याची क्षमता असावी. **(याबाबत अहवाल किंवा प्रशस्तीपत्र, शिफारसपत्र सोबत जोडावे.)**

८. कोणत्याही फौजदारी व इतर स्वरूपाचे गुन्हे किंवा न्यायालयीन प्रकरणात सहभागी असलेल्या संस्था/त्यातील सदस्य/ट्रस्टी अर्ज करू शकत नाही. **(याबाबत संबंधित संस्थेच्या पत्रावर स्वयंघोषणापत्र सादर करावे)**

९. सदर संस्थेचे कार्यालय त्याच जिल्ह्यात किंवा लगतच्या जिल्ह्यात असावे. जर राज्यातील एकूण जिल्हयांचा ५० टक्के जास्त जिल्हयात काम केल्याचे पुरावे असल्यास राज्यस्तरीय नामिका यादी मध्ये विचार करण्यात येईल.

१०.**संस्थेला यापूर्वी काळ्या यादीत टाकलेले नसावे, किंवा कोणत्याही शासकीय अनुदानावा गैरवापर केलेला नसावा.** (याबाबत संबंधित संस्थेच्या पत्रावर स्वयंघोषणापत्र सादर करावे)

**समन्वयक व्यक्ती /संस्था निवड अटी व शर्ती :-**

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिरासाठी समन्वयक म्हणून काम करु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी खालील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक राहील-

१) समन्वयक पदाची पात्रता पूर्ण करणारा कोणताही व्यक्ती/संस्था समन्वयकासाठी अर्ज करु शकतात.

२) समन्वयक पदासाठी वैयक्तिक/संस्था अर्ज करावा

३) **समन्वयक पदासाठी अर्ज करणारी व्यक्ती/संस्था त्या जिल्ह्यातील किंवा लगतच्या जिल्ह्यातील असावी.**

४) एखाद्या व्यक्ती/संस्थेला एका जिल्ह्यातून एकच अर्ज करता येईल. एकापेक्षा जास्त जिल्ह्यातून अर्ज केल्यास संबंधितांचा अर्ज बाद करण्यात येईल.

५) समन्वयक व्यक्ती/संस्थेची नियुक्ती पुढील तीन वर्षासाठी असेल.

६) विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिरासाठी समन्वयक व्यक्ती/संस्थेशी संबंधित असलेले कलाकारांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरणात कोणत्याही दृष्टीने सहभाग घेता येणार नाही.

७) नियुक्त समन्वयक/संस्थेकडून करारपत्र करुन द्यावे लागेल.

८) समन्वयक नियुक्तीनंतर संबंधित समन्वयक/संस्थेला कामाची यादी देण्यात येईल. दिलेल्या यादीनुसार संचालनालयाच्या समन्वयाने समन्वयकाने काटेकोरपणे काम करणे बंधनकारक राहील.

९) विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर दरम्यान संचालनालयाशी समन्वय ठेवून शिस्तबध्द कार्यक्रमांचे आयोजन विषयक कामे करणे आवश्यक आहे.

१०) समन्वयक नियुक्तीनंतर समन्वकाबद्दल तक्रार प्राप्त झाल्यास तसेच तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित समन्वयकाची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल तसेच उचित कारवाई केली जाईल.

**११) समन्वयकांकडे सोपविण्यात आलेली सर्व कामे पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांची राहिल, असे प्रस्तावित करण्यात येत आहे.**

**आवश्यक कागदपत्रे :-**

समन्वयक संस्थेसाठी आवश्यक कागदपत्रे :-

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

२. कार्यकारी समितीची यादी.

३. संस्थेचा पत्ता पुरावा (वीज बिल, भाडे पावती इ.).

४. ओळखपत्र (आधार कार्ड/पॅन कार्ड).

समन्वयक व्यक्तीसाठी आवश्यक कागदपत्रे :-

१. बायोडाटा (सीवी)

२. अनुभवाचे दाखले

३. ओळखपत्र (आधार कार्ड/पॅन कार्ड)

४. रहिवाशी दाखला

**निवड समिती :-**

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या स्तरावर गठित करण्यात आलेली छाननी समिती हिच निवड समिती ठेवण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या विभागीय कार्यालयाच्या स्तरावर सहाय्यक संचालक, जिल्हा माहिती अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी, अधीक्षक, कार्यक्रम अधिकारी, पुरातत्व संचालनालय, पुराभिलेख संचालनालय यांची निवड समिती गठित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**सांस्कृतिक कार्य संचालनालय-मुख्य कार्यालय निवड समिती**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | अध्यक्ष |
| २) | संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई | सदस्य |
| ३) | संचालक, हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी | सदस्य |
| ४) | सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई | सदस्य |
| ५) | सांस्कृतिक क्षेत्रातील ५ ज्येष्ठ मान्यवर | सदस्य |
| ६) | सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

**सांस्कृतिक कार्य संचालनालय-पुणे, नागपूर व छ.संभाजीनगर विभागीय कार्यालय निवड समिती**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | अध्यक्ष |
| २) | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३) | पुरातत्व संचालनालय | सदस्य |
| ४) | पुराभिलेख संचालनालय | सदस्य |
| ५) | सांस्कृतिक क्षेत्रातील ५ ज्येष्ठ मान्यवर | सदस्य |
| ६) | कार्यक्रम अधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

**समितीचा कार्यकाळ :-**

समितीचा कार्यकाळ ३ वर्षांचा ठेवण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता व बैठक भत्ता मंजुर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समन्वयक/संस्था कालावधी**

नियुक्त केलेल्या समन्वयक/संस्थेचा कालावधीचा कार्यकाळ हा पुढील ३ वर्षांसाठी असेल.

**जाहिरातीद्वारे अर्ज मागविणे :-**

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वयक पदासाठी विभागवार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल. जाहिरातीच्या अनुषंगाने https://www.mahasanskruti.org या वेबपोर्टलवर अर्जाचा नमुना तसेच अटी, शर्ती व पात्रता ठेवण्यात येतील. विहित मुदतीत प्राप्त झालेले अर्ज तपासणी तसेच छाननीसाठी ठेवण्यात येतील. विहित नमुद केलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**गुणांकन :-**

| अ. क्र | तपशिल | गुण |
|---|---|---|
| १ | विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर आयोजनाचा अनुभव असल्यास | १० |
| २ | नाट्यविषयक, कार्यक्रम व्यवस्थापन पदवी असल्यास | ५ |
| ३ | इतर सांस्कृतिक ५ कार्यक्रमांचे आयोजन विषयक असल्यास अनुभव | ५ |
| | **एकुण गुण** | **२०** |

- उपरोक्त तक्ता अ.क्र. १ मध्ये नमुद करण्यात आलेल्या अनुभवाचे गुणांकन खालील प्रमाणे करण्यात येत आहे-

| अ. क्र. | किमान अनुभव कार्यक्रम | गुण |
|---|---|---|
| १ | ५ | २ |
| २ | १० | ४ |
| ३ | २० | ६ |
| ४ | ३० | ८ |
| | ४० पेक्षा जास्त | १० |

तथापि, मागील ०५ वर्षाच्या कालावधीत एखाद्या व्यक्ती / संस्थेने संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयासोबत २० कार्यक्रमांसाठी समन्वयक म्हणून काम केले असल्यास सदर शासन निर्णय लागू झाल्यापासून किमान ०३ वर्ष सदर संस्था/ व्यक्ति यांच्या अर्जाचा विचार करण्यात येऊ नये. समन्वयक व्यक्ति /संस्था संचालनालयासाठी समन्वयक म्हणून जास्तीत जास्त ०२ वेळा काम करू शकते. सदर कालावधी विचारात घेताना सलग नसावा.

निवड समिती बैठक :-

विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन सदरचे अर्ज निवड समितीसमोर पुढील कार्यवाहीसाठी ठेवण्यात येतील. निवड समिती विहित नमुद केलेल्या गुणांकन पध्दतीनुसार अर्जांची तपासणी करुन पात्र समन्वयकांची यादी तयार करण्यात येईल. प्राप्त अर्जातून समन्वयक निवडणे अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार समितीला राहील. समितीने घेतलेला निर्णय सर्व अर्जदारांना बंधनकार राहील.

समन्वयक मानधन :-

विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वयक यांना एका त्या त्या कार्यक्रमाच्या दर्जानुसार आयोजनासाठी प्रत्येकी रु.१५,०००/- ते रु.५५,०००/- इतके मानधन निश्चित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

| क्र. | कार्यक्रम तरतुद | समन्वयक मानधन |
|---|---|---|
| १ | रु. ५.०० लक्ष पेक्षा कमी | रु. १५,०००/- |
| २ | रु.५.०० ते रु.१०,०० लक्ष रु. २५,०००/- | रु. २५,०००/- |
| ३ | रु.१०.०० ते रु. २०.०० लक्ष | रु. ३५,०००/- |
| ४ | रु.२०.०० ते ५०,०० लक्ष | रु.४५,०००/- |
| ५ | रु.१.०० कोटी पेक्षा जास्त | रु. ५५,०००/- |

समन्वयक संख्या :-

३६ जिल्ह्यातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर कार्यक्रमांसाठी समन्वयक निवडण्यात येतील. हे समन्वयक एका जिल्ह्यात किती असावेत याचा निर्णय सदरील समिती घेईल. एखाद्या जिल्ह्यातील कार्यक्रम करण्यास समन्वयकाने नकार दिल्यास लगतच्या जिल्ह्यातील समन्वयकाच्या मदतीने सदरचा कार्यक्रम करण्यास मान्यता मिळावी.

उपरोक्त प्रमाणे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव, विविध स्पर्धा व शिबिर समन्वय निवडीची विहित पध्दत अवलंब करण्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

Ω Ω Ω